## दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र आयोजित

आंतरमहाविद्यालयीन सुगम संगीत स्पर्धा - २०२६-२७

प्रति, दिनांक:-

प्राचार्य

____________________________

____________________________

____________________________

विषय : - आंतरमहाविद्यालयीन सुगम संगीत स्पर्धा

महोदय,

वरील स्पर्धा रविवार दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, मुंबई येथे सकाळी १०.०० वाजता भरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी आपल्या महाविद्यालयातर्फे प्रवेशिका पाठवाव्यात ही विनंती. विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी कृपया सोबतचे स्पर्धेचे नियम सूचना फलकावर लावावेत.

आपल्या सहकार्याबद्दल आभार.

आपला

रवींद्र आवटी

निमंत्रक, आं. म. सु. सं. स्पर्धा

दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र

इमेल:-dadarmatunga@gmail.com

१२२-अे, जे. के. सावंत मार्ग,

माटुंगा पश्चिम, मुंबई - ४०० ०१६

दूरध्वनी क्र.०२२-२४३० ४१५० /९८९२५ ८६३८८

## दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र आयोजित

आंतरमहाविद्यालयीन सुगम संगीत स्पर्धा - २०२६-२७

### नियम व अटी

१. ही स्पर्धा मुंबई आणि मुंबई बाहेरील सर्व राज्यांतील विद्यापिठांच्या ज्युनिअर आणि सिनिअर कॉलेजच्या तसेच विद्यापिठातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शन मान्यताप्राप्त कलावंत तसेच या स्पर्धेच्या अंतिम फेरीत सलग तीन वर्षे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवणाऱ्या स्पर्धकांना या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२. स्पर्धेत फक्त मराठी किंवा हिन्दी भाषेतील गीत, गझल, भावगीत, भक्तिगीत किंवा अभंग सादर करता येईल. चित्रपट गीतांना व नाट्यसंगीताला परवानगी नाही.

३. प्रत्येक स्पर्धकाला आपले गीत सादर करण्यासाठी पाच मिनिटांचा अवधी देण्यात येईल.

४. हार्मोनियम, तबला आणि तानपुरा इतकीच वाद्ये साथ-संगतीसाठी वापरता येतील. हार्मोनियम, तबला या वाद्यांची आणि वादकांची व्यवस्था संस्थेतर्फे करण्यात येईल. हार्मोनियम व तबला यांच्या साथीशिवाय स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

५. गीतांच्या लिखित शब्दांची प्रत किंवा भ्रमणध्वनी समोर ठेवून गाता येणार नाही.

६. संपूर्ण भरलेली प्रवेशिका दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, मुंबई यांच्याकडे दिनांक २३/१०/२०२६ पर्यंत प्रवेश फी रु.२००/- सहित पोहोचणे आवश्यक आहे. स्पर्धकाने महाविद्यालयाच्या चालू वर्षाच्या ओळखपत्राची किंवा चालू वर्षाच्या फी पावतीची स्वच्छ झेरॉक्सप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे. स्पर्धेची प्रवेश फी Gpay, UPI, NEFT Bank transfer ने भरता येईल.

७. स्पर्धा प्राथमिक आणि अंतिम अशा दोन फेऱ्यांत घेण्यात येईल. मुंबई केंद्रावरील प्राथमिक फेरी स्पर्धा दिनांक २५/१०/२०२६ या दिवशी सकाळी १०.०० वाजता दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, मुंबई येथे घेण्यात येईल. सर्व स्पर्धकांनी वरील केंद्रावर उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

८. प्राथमिक स्पर्धेतून निवडलेल्या स्पर्धकांची अंतिम फेरी दिनांक २५/१२/२०२५ या दिवशी दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र येथे सकाळी ९.३० वाजता घेण्यात येईल.

९. अंतिम स्पर्धेसाठी निवडलेल्या स्पर्धकांनी स्पर्धेच्या दिवशी सकाळी ९.३० वाजता उपस्थित रहावे. मुंबईबाहेरील स्पर्धकांस जाण्यायेण्याचे द्वितीय वर्गाचे शयनयानाचे रेल्वे भाडे देण्यात येईल. निवासाची व्यवस्था स्पर्धकांस करावी लागेल.

१०. अंतिम स्पर्धेसाठी निवडलेल्या स्पर्धकांना त्यांच्या पसंतीच्या कोणत्याही तीन गीतांची यादी प्राथमिक स्पर्धेनंतर १० दिवसांत सादर करावी लागतील. त्यात बदल करता येणार नाही. त्यापैकी परीक्षकांनी निवडलेले गीत स्पर्धकाला सादरीकरणापूर्वी दहा मिनिटे आधी सांगण्यात येईल. परीक्षकांच्या निवडीत बदल करता येणार नाही.

११. अंतिम स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात येतील.

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक रु.दहा हजार व प्रशस्तीपत्रक | श्रीमती लीलादेवी सोमाणी |
| दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र व | श्रीमती मधुबाला चावला |
| कामेरकर कुटुंबिय फिरता चषक | श्रीमती सुधा राव |
| द्वितीय पारितोषिक रु.सात हजार व प्रशस्तीपत्रक | श्री बाळ जव्हेरी आणि |
| तृतीय पारितोषिक रु.पाच हजार व प्रशस्तीपत्रक | श्रीमती अंजली कुसरे |

आणि दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र यांच्यातर्फे देण्यात येतील.

प्राथमिक फेरीत निवड झालेल्या प्रत्येक केंद्रावरील सर्वोत्कृष्ट स्पर्धकास पारितोषिक रोख रु. एक हजार अंतिम फेरीच्या वेळी देण्यात येईल. प्राथमिक फेरीतील सर्व स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रथम पारितोषिक विजेत्या स्पर्धकाच्या महाविद्यालयास कै. विष्णू रामचंद्र केळकर ढाल प्रदान करण्यात येईल. अंतिम स्पर्धेतील पारितोषिक विजेते व प्राथमिक फेरीत निवड झालेल्या स्पर्धकांना स्मतीचिन्हे प्रदान करण्यात येतील.

१२. परीक्षकांचा निर्णय अंतिम व स्पर्धकांवर बंधनकारक राहील.

१३. आवश्यकतेनुसार वरील नियम व अटीत बदल करण्याचे अधिकार संस्थेकडे राहतील.

अधिक माहितीसाठी संपर्क

दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र
इमेल:-dadarmatunga@gmail.com
१२२-अे, जे. के. सावंत मार्ग,
माटुंगा पश्चिम, मुंबई - ४०० ०१६
दूरध्वनी क्र.०२२-२४३० ४१५० / ९८९२५ ८६३८८

**दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र आयोजित**

आंतरमहाविद्यालयीन सुगम संगीत स्पर्धा - २०२६-२७

**प्रवेश अर्ज**

दिनांक:-

नाव: ____________________

पत्ता: ____________________

____________________

इमेल: ____________________

दूरध्वनी / भ्रमणध्वनी : ____________ जन्मदिनांक: ____________

मी ____________________ या महाविद्यालयाच्या पटावरील विद्यार्थी आहे. स्पर्धेचे सर्व नियम आणि अटी मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

स्पर्धकाची सही

दिनांक:

---

आंतरमहाविद्यालयीन सुगम संगीत स्पर्धा - २०२६-२७

पावती

श्री. / श्रीमती ____________________ यांच्याकडून स्पर्धेची फी रु.२००/- मिळाली.

**दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, मुंबई** यांच्याकरिता